# प्रेस नोट

**इंस्टाग्राम अकाउंन्ट वर मुलीचे फोटो पोस्ट करुन बदनामी करणाऱ्या आरोपीस अटक**

कॉलेजच्या बऱ्याच मुलींना अज्ञात व्यक्ती या फेक इंन्स्टाग्राम अकाउंन्ट तयार करुन फ्रेंण्ड रीक्वेस्ट पाठवित होता. सदरची फ्रेण्ड रीक्वेस्ट ॲक्सेप्ट केल्या नंतर तो त्यांचा फ्रेण्ड लिस्ट मध्ये असणाऱ्या मैत्रिणींचे नंबर मागून घेत असे. नंबर मिळाल्या नंतर तो त्यांच्याशी वॉटसॲप द्वारे चॅटींग करीत होता. एखादया मुलीने तिचा नंबर देण्यास नकार दिला की, तो तिचे फोटो घेवून तिच्या दुसऱ्या मैत्रिणीच्या नावाने फेक इंन्सटाग्राम अकाउंन्ट तयार करुन मुलींचे फोटो व मोबाईल नंबर सदर फेक अकाउंन्ट वर पोस्ट करीत असे व त्यावर कॉल गर्ल अशी कमेंन्ट पोस्ट करीत होता. त्यामुळे मुलींना वेगवेगळया नंबर वरुन सतत फोन येवून मानसिक त्रास होत असल्याने फिर्यादीने सदरबाबत सिंहगड पोलीस ठाणे, पुणे शहर येथे गुन्हा रजि. नं २४२/१९कलम ३५४ डी भा.द.वि कायदा कलम ६६ सी व ६७ ए आयटी ॲक्ट अन्वये दि. १७/०३/२०१९ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अशाच प्रकारचे फेक इंन्टाग्राम अकाउंन्ट, कोथरुड व डेक्कन परीसरात रहाणाऱ्या मुलींचे तयार केल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे. दाखल गुन्हाचा समांतर तपास सायबर पोलीस ठाणे, शिवाजीनगर,पुणे करित असताना सायबर पोलीस ठाणे कडील पो.उप-निरीक्षक किरण औटे यांनी दाखल गुन्हामधील आरोपी बाबत सखोल माहिती काढून मिळालेल्या माहिती वरुन आरोपी नामे रवी कुमार पासवान रा. रोहतास, बिहार यास पोलीस उप-निरीक्षक किरण औटे व त्यांच्या पथकाने फाईव्ह स्टार एमआयडीसी कागल,कोल्हापूर येथून ताब्यात घेवून पुढील तपासकामी सिंहगडरोड पोलीस स्टेशनचे ताब्यात दिले आहे. सदर आरोपीकडून १० ते १२ गुन्हे केल्याचे निष्पन्न झाले आहे. अशा प्रकारचे आणखी गुन्हे कोठे घडले असल्यास संबधीत पो.स्टे व सायबर पोलीस ठाणे शी संपर्क करावा.

वरील कामगिरी पोलीस उप-आयुक्त आर्थीक व सायबर गुन्ह श्री. संभाजी कदम व सहा.पोलीस आयुक्त आर्थीक व सायबर गुन्हे श्री निलेश मोरे यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक जयराम पायगुडे, उपनिरीक्षक किरण औटे, मंदा नेवसे, पोलीस कर्मचारी शिरीष गावडे, आदेश चलवादी, माधुरी डोके, ज्योती दिवाणे यांनी केली आहे.

दाखल गुन्हाचा पुढील तपास सिंहगडरोड पोलीस स्टेशन करित आहे. आरोपीने कितीही हुशारीने कोणत्याही ॲपवर मुलींचे फेक अकाउंन्ट तयार करण्याचा प्रयत्न केला तरीही ते लपून रहाणार नाही. तसेच मुलींनी त्यांचेबाबतीत असा काही प्रकार घडल्यास न घाबरता गुन्हा दाखल करणेकामी समोर यावे. पुणे सायबर पोलीस ठाणेची सोशल मिडीयावर गुन्हे करणाऱ्यांवर नजर आहे.

( संभाजी कदम )
पोलीस उप-आयुक्त,
आ व सा गुन्हे, पुणे शहर

Scanned by CamScanner